नवनिर्मित पालघर जिल्हा परिषदेसाठी वित्त विभागतंर्गत गट अ, ब, क व ड च्या कर्मचाऱ्यांचा पदनिर्मितीबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एपिटी-२०१४/प्र.क्र -१५१ /आस्था- ८,**

**२५- मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट,**

**मुंबई-४०० ००१,**

**दिनांक : १८ डिसेंबर, २०१४.**

**शासन निर्णय-**

शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. प्राफेब-११०८/प्र.क्र.१६७/ठाणे/म-१०, दिनांक ३१-७-२०१४ अन्वये जिल्हयाचे विभाजन करुन पालघर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच शासन अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्र. झेडपी-२०१२/१०६९/प्र.क्र. २१७(१)/पं.रा.१, दिनांक ३१-७-२०१४ अन्वये ठाणे व पालघर या जिल्हा परिषदांची निर्मिती करण्यात आली आहे. नवीन पालघर जिल्ह्याकरिता ५६ नवीन कार्यालये निर्माण करणे आवश्यक असल्याने सदर कार्यालयासाठी लागणारा अधिकारी/कर्मचारीवृंद, उच्चाधिकार समितीची मान्यता घेऊन त्या त्या विभागाने निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. नवीन पालघर जिल्हयात वसई, पालघर, डहाणू, तलासरी, जव्हार, वाडा, मोखाडा, विक्रमगड या आठ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार नवनिर्मित पालघर जिल्हा परिषदेसाठी किमान कर्मचारीवृंद पुरविणे आवश्यक आहे.

.२ सोबतच्या प्रपत्र“ -अ ”मध्ये दर्शविण्यात आल्यानुसार नवनिर्मित पालघर जिल्हा परिषदेकरिता वित्त विभागांतर्गत गट अ, ब, क व ड च्या संवर्गातील ३६ अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे दि.०१.०८.२०१४ पासून नव्याने निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे.

३. जिल्हा प्रशासनाने गट-क व गट- ड या संवर्गातील पदे भरताना बाह्यस्रोताद्वारे (outsourcing) पदे भरता येवू शकतील किंवा कसे यासंदर्भात शक्यता पडताळून पदभरतीची प्रक्रिया अवलंबावी. त्याचबरोबर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदे भरताना शिपाई/पहारेकरी/नाईक/ सफाईगार अशा वेगळया संवर्गाऐवजी multitasking स्वरुपाच्या जबाबदाऱ्या देवून पदभरती करता येऊ शकेल काय याची पडताळणी करुनच पदभरती प्रक्रिया अवलंबावी.

Scanned with CamScanner

४. नवनिर्मित पालघर जिल्हा परिषदेतंर्गत या ३६ पदांकरिता वेतन व वेतनेतर खर्च जिल्हा परिषदेतंर्गत कार्यरत सामान्य प्रशासन व ग्राम पंचायत विभाग यांच्या मागणी क्र. एल-२ लेखाशिर्ष "२०५३-जिल्हा प्रशासन -०९३, जिल्हा आस्थापना (५) स्थानिक क्षेत्रातील योजना महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १८३ नुसार ( आस्थापना अनुदाने ) (०५) (०१) सुधारित कर्मचारी वर्ग रचना पध्दती ( २०५३०५६५ ) " या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. ३७२/२०१४ / व्यय-१५, दिनांक २२-७-२०१४ अन्वये तसेच उच्चस्तरीय सचिव समितीने बैठक क्रमांक ८५ व ८७ मध्ये दिलेल्या मान्यतेच्या अधिनतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४११२०१२४७४०३१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Eknath Kulkarni

Digitally signed by Anil Eknath Kulkarni
DN: CN = Anil Eknath Kulkarni, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Rural Development Department
Reason: I am approving this document
Date: 2014.12.18 12:17:23 +05'30'

( अ.ए. कुलकर्णी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२) मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री, ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा.राज्यमंत्री ग्रामविकास,महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
५) सर्व विभागीय आयुक्त,
६) सर्व जिल्हाधिकारी,
७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,



Scanned with CamScanner

८) मुख्य कार्यकारी अधिकारी ,ठाणे/ पालघर
९) मुख्य लेखा अधिकारी जिल्हा परिषद,ठाणे/ पालघर
१०) कोषागार अधिकारी, ठाणे/ पालघर
११) महालेखापाल -१/२, ( लेखा परीक्षा / लेखा अनुज्ञेयता ) महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर
१२) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४) वित्त विभाग (अर्थसंकल्प-३/व्यय-१५, वित्तीय सुधारणा-१/कोषा-२) मंत्रालय,मुंबई
१५) क.अ (वित्त -१ कार्यासन ) ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
१६) सर्व सह / उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
१७) निवड नस्ती, कार्यासन आस्था-८



Scanned with CamScanner

"प्रपत्र-अ"

## जिल्हा परिषद पालघर अंतर्गत वित्त विभागासाठी गट अ,ब,क व ड संवर्गातील मंजुर पदे

| अ.क्र | पदनाम | संवर्ग | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | वर्ग-१ | १५६००-३९१००+ग्रे.वे.६६०० | १ |
| २ | वरिष्ठ लेखा अधिकारी | वर्ग-१ | १५६००-३९१००+ग्रे.वे.५४०० | १ |
| ३ | लेखा अधिकारी | वर्ग-२ | ९३००-३४८००+ग्रे.वे.४४०० | २ |
| ४ | सहाय्यक लेखा अधिकारी | वर्ग-३ | ९३००-३४८००+ग्रे.वे.४३०० | ६ |
| ५ | कनिष्ठ लेखा अधिकारी | वर्ग-३ | ९३००-३४८००+ग्रे.वे.४२०० | ३ |
| ६ | वरिष्ठ सहाय्यक(लेखा) | वर्ग-३ | ५२००-२०२००+ग्रे.वे. २४०० | ९ |
| ७ | वरिष्ठ सहाय्यक(आस्था) | वर्ग-३ | ५२००-२०२००+ग्रे.वे. २४०० | १ |
| ८ | कनिष्ठ सहाय्यक(लेखा) | वर्ग-३ | ५२००-२०२००+ग्रे.वे. १९०० | ९ |
| ९ | शिपाई | वर्ग-४ | ४४००-७४००+ग्रे.वे. १३०० | ४ |
| | | एकूण | | ३६ |

उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद पालघर



Scanned with CamScanner